दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक १४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.१५ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### पनवेल महापालिका व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्यावतीने

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारत देश स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. याच पार्श्वभूमीवर पनवेल महापालिका व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्यावतीने ढोल–ताशा, लेझीम, चित्ररथ–ासहीत लोकसहभागातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्याचबरोबर निबंध, वक्तृत्व स्पर्धा अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला.

सकाळी सात वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून महापौर डॉ.कविता किशोर चौतमोल, आमदार प्रशांत ठाकूर, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, आयुक्त गणेश देशमुख, अतिरीक्त आयुक्त तृप्ती सांडभोर,सर्व नगरसेविका, नगरसेवक, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त कैला गावडे, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, तहसिलदार विजय तळेकर यांनी अभिवादन केले.

यानंतर लेझीम,ढोल–बॅण्ड पथकाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित चित्ररथ बनविण्यात आले होते. याबरोबरच सावित्रीबाई महिला मंडळ, रमाबाई महिला मंडळ यांनी सामुहिक गायन केले.या मिरवणूकीची सांगता डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाजवळ करण्यात आली.पुढील समारोपाचा



कार्यक्रम डॉ बाबासाहेब आंबेडकर भवनामध्ये घेण्यात आला. याठिकाणी महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांनी मिरवणूकीत सहभागी झालेल्या विविध संघटना ,महिला मंडळे, पोलिस विभाग, ट्राफिक पोलिस, वर्गणीदार सर्वांचे आभार मानले. तसेच मिरवणुकीतील स्पर्धेत सहभागी झालेल्या ढोल–ताशा मंडळे, लेझीम पथके, चित्ररथ यांचे क्रमांक जाहीर करण्यात केले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिका व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्यावतीने दिमाखात काढलेल्या मिरवणुकीचे, यानिमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे कौतुक केले. महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या पुढाकारातून केलेल्या विविध समाजोपयोगी कार्याचा उल्लेख करत येत्या काळात देशातील सर्वोकृष्ट महापालिकेच्या यादीत पनवेल महापालिकेचा समावेश होईल असे प्रतिपादन केले.

नगरसेवक प्रकाश बिनेदार यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. उपमहापौर सीतामाई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, उपायुक्त विठ्ठल डाके, तहसिलदार विजय तळेकर, भाजप शहराध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक, नगरसेविका, महापालिका अधिकारी व कर्मचारी, शिक्षक, विविध संस्थांचे सदस्य, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेएनपीटी वसाहतीत इमारतीचे छत कोसळले

## घरातील रहिवाशी थोडक्यात बचावले

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदराच्या वसाहती मधिल एका इमारतीचे छत कोसळण्याची दुर्घटना गुरुवारी ( दि१४) सकाळच्या सुमारास घडली. घरातील रहिवाशींच्या प्रसंग सावधानतेमुळे थोडक्यात बचावले असल्याचे रहिवाशांकडून सांगण्यात येत आहे.

मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर जेएनपीटी हे जागतिक किर्तीचे बंदर आहे.या बंदरात तसेच बंदरावर आधारित इतर प्रकल्पात काम करत असलेल्या कामगारांना वेळच्या वेळी कामावर हजर होता यावे, यासाठी जेएनपीटी बंदराच्या प्रशासनाने जसखार ग्रामपंचायत हद्दीत भव्यदिव्य अशा सुसज्ञ वसाहतीची उभारणी केली आहे. सदर वसाहती मधिल इमारतीची दुरावस्था झाल्याने बंदर प्रशासनाने मागील दोन वर्षापुर्वी सुमारे १५० कोटी रुपयांचा निधी दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आला. परंतु सदर इमारतीचे नव्याने करण्यात येत असलेले दुरुस्तीचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाल्याने रहिवाशांच्या फ्लॅट मध्ये काही दिवसातच पावसाचे पाणी झिरपू लागले. तसेच काही इमारतींच्या प्लॉटच्या बांधकामाची पडझड सुरू झाली आहे.



या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते व रहिवाशांनी बंदर प्रशासनाकडे तक्रार दाखल करुन वसाहती मधिल इमारतीचे पुन्हा स्ट्रक्चरल ऑडिट करावे अशी मागणी केली. परंतु बंदर प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे रहिवाशांना वसाहतीत उद्भवणाऱ्या समस्यांचा सामना करत आप आपल्या कुटुंबासह राहण्याची नामुष्की ओढवली आहे. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती व महावीर जयंती साजरी करण्यास रहिवाशी तल्लीन असताना गुरुवारी ( दि१४) सकाळच्या सुमारास जेएनपीटी वसाहतीमधिल सेक्टर १ बिल्डिंग ७० बी मधिल इमारतीचे छत कोसळण्याची दुर्घटना घडली. घरातील रहिवाशांच्या प्रसंग सावधानतेमुळे रहिवाशी थोडक्यात बचावले असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा एकदा उभा ठाकला आहे.



**खालसा पंथ स्थापना दिनानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवीन पनवेल येथील गुरुद्वाराला सदिच्छा भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी गुरुद्वाराचे हरचंद सिंग, बलविंदर सिंग सैनी, हरविंदर सिंग कुल्लर व इतर पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत सत्कार केला.**

## संक्षिप्त...

### गुणरत्न सदावर्ते सातारा पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मागील ४ महिन्यापासून एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरू होते. त्यात काही संतप्त कर्मचाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक घरावर हल्ला केला होता. या हल्ल्याप्रकरणी वकील गुणरत्न सदावर्ते यांच्यासह १०९ जणांना अटक करण्यात आली होती. याप्रकरणी गिरगाव कोर्टाने गुणरत्न सदावर्तेंना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यामुळे सदावर्ते यांना जामीन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, तत्पूर्वीच सातारापोलिसांनी त्यांचा ताबा घेतला आहे.

मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने सदावर्ते यांनी छत्रपती घराण्यासंदर्भात बदनामी करणारं वक्तव्य केलं होतं. तेढ निर्माण होईल, असं ते वक्तव्य असल्याने त्यांच्याविरोधात सातारा शहर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली होती. दीड वर्षापूर्वी केलेल्या विधानावरून सदावर्तेंवर साताऱ्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यावर कोर्टाने सदावर्तेंना अटक करण्याची नोटीसही बजावली. त्यानुसार गिरगाव कोर्टात सातारा पोलिसांनी सदावर्तेंचा ताबा देण्यासाठी अर्ज केला होता. त्याला कोर्टाने परवानगी देत १७ एप्रिलला पर्यंत ताबा घेण्यास सांगितले आहे. त्यानुसार, सातारा पोलीस कालच मुंबईत दाखल झाले. त्यानंतर, गुणरत्न सदावर्तेंना ताब्यात घेऊन ते आज साताऱ्याला रवाना झाले आहेत. पोलिसांसमवेत मोठा फौजफाटा दिसून आला. दरम्यान, गिरगाव कोर्टात सुनावणी होताना सरकारी वकिलांनी सदावर्ते यांना ७ दिवसांची आणखी कोठडी सुनावण्यात यावी अशी मागणी केली होती. दोन्ही बाजूचा युक्तिवाद संपल्यानंतर कोर्टाने सदावर्ते यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

# संदीप गोडबोलेची १६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी करण्यात आलेल्या आंदोलन प्रकरणात नागपूरमधून ताब्यात घेण्यात आलेल्या संदीप गोडबोले याची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पोलिसांना १६ एप्रिलपर्यंत त्याची चौकशी करता येईल. मुंबई पोलिसांनी संदीप गोडबोले याला बुधवारी नागपूरमध्ये अटक करून मुंबईत आणले होते. त्यानंतर आज त्याला न्यायालयात सादर करण्यात आले.

शरद पवार यांच्या घरावर आंदोलक धडकण्यापूर्वी गुणरत्न सदावर्ते आणि संदीप गोडबोले यांच्यात फोनवरून बोलणे झाले होते. हे संभाषण पोलिसांच्या हाती लागले आहे. त्याआधारे आता पोलीस तपास करत आहेत. संदीप गोडबोले आणि गुणरत्न सदावर्ते यांना समोरासमोर बसवून चौकशी करायची आहे. त्यासाठी पोलीस कोठडी हवी असल्याचे सरकारी वकिलांनी न्यायालयात सांगितले. त्यानुसार न्यायालयाने संदीप गोडबोले यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

.../२

# सुकेळी येथील दोन वेगवेगळ्या अपघातात पाचजण जखमी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

मुंबई–गोवा महामार्गावर अपघातांची मालिका सुरू असतांनाच महामार्गावर आज सकाळी सुकेळी गावाच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या अपघातांमध्ये पाच जण गंभीररित्या जखमी झाले. हे दोन्ही अपघातात गुरुवारी (दि.१४) रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडले. टँकर उलटल्याने एक बाजूचा रस्ता पूर्णतः बंद होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

या अपघातासंदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार मुंबई बाजुकडुन महाडकडे जाणारी वॅगनर कार सुकेळी येथिल जिंदाल गेटच्या समोर असलेल्या गतिरोधकाजवळ आली असता वॅगनर गाडी चालकाने ब्रेक मारल्यानंतर मागुन भरधाव असलेल्या सॅन्ट्रो कार चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने कार वॅगनर गाडीवर धडकली. यामध्ये सॅन्ट्रो गाडीतील शर्मिला शाम यादव (वय– ५०) , मनिषा सुनिल लुष्टे (वय– ४१), कुणाल सुनिल लुष्टे (वय– २१), तर तेजस सुनिल लुष्टे (वय– १९) हे चौघेजण गंभीररित्या जखमी झाले. त्यांच्यावर जिंदाल रुग्णालयात प्रथमोपचार करून अधिक उपचारांसाठी पुढे पाठवण्यात आले.



तर दुसरा अपघात हा सुकेळी खिंडीमध्ये घडला. यामध्ये गोवा बाजुकडून मुंबईकडे जाणाऱ्या टँकर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे टँकर रस्त्यावरुन दुस–या बाजूला खाली असलेल्या रस्त्याच्या मधोमध पलटी झाला. सुदैवाने हा टँकर रिकामा असल्याने पुढील अनर्थ व जिवीतहानी टळली. यामध्ये चालक इशाद अहमद (वय–३३) हा गंभीर जखमी झाला. त्याला नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले.

दरम्यान सलग चार दिवस सुट्टया असल्यामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ होती. त्यातच या टँकर अपघातामुळे गोवा बाजुकडे जाणारा रस्ता बंद करण्यात आल्यामुळे थोडा वेळ वाहतुक कोंडी झाली. महामार्गावरील ऐनघर वाहतूक पोलिस चौकीचे पोलिस उपनिरीक्षक परशुराम भोईर यांनी त्यांच्या पथकाकडून वाहतुक सुरळीत करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

या दोन्हीही अपघातांचा तपास नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तानाजी नारनवार यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# नावडे फाटा उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्याने वाहतूक कोंडीतून होणार सुटका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक क्षेत्रात जाण्यासाठी नावडे फाटा येथे उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून, येत्या आठवड्याभरात पूल वाहतुकीसाठी खुले केला जाण्याची शक्यता आहे. या उड्डाणपुलामुळे वाहतूक कोंडीतून सुटका होणार असल्यामुळे नावडे परिसरातील रहिवासी समाधान व्यक्त



करीत आहेत.

पनवेल–मुंब्रा मार्गावर .../२



**तळा नगरपंचायतीच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधून पोलीस दलातील निवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण सखाराम तळकर यांचा सत्कार तळ्याचे नगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांच्या हस्ते करण्यात आला.**

# कर्जत नगरपरिषद हद्दीमध्ये गॅस्ट्रोचे रुग

## पाण्याच्या नमुन्यांचे अहवाल नॉर्मल

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद हद्दीमध्ये गॅस्ट्रोचे रुग आढळून आले आहेत, त्यामुळे नगरपरिषदेचे एकच धावपळ उडाली आहे, नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी घटनास्थळी पाहणी केली व तातडीने पाण्याचे नमुने तपासणी साठी पाठवले पाण्याच्या नमुन्याचा अहवाल नॉर्मल आला आहे, मात्र हे रुग्णांना गॅस्ट्रोची लागण कशी झाली याचा शोध आरोग्य विभाग घेत आहे.



काल दि.१३ एप्रिल रोजी उपजिल्हा रुग्णालय मधून कर्जत नगरपरिषदेस एक पत्र आले ज्यामध्ये आठ ते दहा गॅस्ट्रोचे रुग्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, त्यामुळे नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी आरोग्य विभाग कर्मचारी यांची तातडीने बैठक घेऊन ज्या परिसरात रुग्ण सापडले आहेत, त्या परिसराचे पाईपलाईन ला कुठे लिकेज आहे का? याची तपासणी करून घेण्यास सांगितले. तसेच पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठवले, .../२

> नगरपरिषद क्षेत्रात गॅस्ट्रोचे रुग्ण सापडले आहेत हे रुग्ण उपजिल्हा रुग्णालयात दाखल आहेत, आज दि.१४ एप्रिल रोजी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी जलशुद्धीकरण केंद्रास भेट देवून पाहणी केली, तिथं योग्य प्रमाणात क्लोरिन मिक्स केले जात असल्याचे मीडियाला सांगितले, काल पाण्याचे नमुने तपासले ते सुद्धा योग्य आहेत. उलटया आणि जुलाब याचे काही रुग्ण आढळले आहेत तरी खबरदारी म्हणून नागरिकांनी पाणी गाळून आणि उकळून प्यावे. तसेच बाहेरील पदार्थ आणि पेय पिऊ नये असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी नागरिकांना केले आहे.

> नगरपरिषदेने तातडीने सर्व पावले उचलली असून,योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे, रुग्ण आढळल्यास त्वरित उपजिल्हा रुग्णालय किंवा नगरपरिषद मध्ये कळवावे
> **सुवर्णा जोशी- नगराध्यक्षा, कर्जत नगरपरिषद**

# खासगी शाळांचे दुखणे

प्राथमिक (खरे तर माध्यमिक व उच्च माध्यमिकही) शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी यात शंका नाही. शिक्षण हक्क कायद्याद्वारे (आरटीई) सरकारने पहिली ते आठवी या इयत्तांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली असून, स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित खासगी संस्था यांच्या शाळांद्वारे ती पार पाडलीही जात आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण हा विद्यार्थ्यांसाठी कायद्याने अधिकार नसला, तरी शाळांचे आणि कनिष्ठ महाविद्यालयांचे जाळे राज्यात विस्तारत आहे, हे खरे. तरीही शिक्षणासाठी केंद्रातील आणि राज्यातील सरकारे पुरेशी गुंतवणूक करीत नसल्याने शाळा अपुऱ्या पडत आहेत, शिक्षकांच्या जागाही रिक्त आहेत. परिणामी खासगी शाळांची संख्या वाढते आहे. गुणवत्तेबाबत सरकारी आणि खासगी शाळा यांच्यात तफावत असल्याचे (आभासी) चित्र निर्माण झाले असून, पालकांचा ओढा खासगी शाळांकडे अधिक आहे. सर्व खासगी शाळा दर्जेदार असतात असे म्हणणे धाडसाचे ठरेल. खासगी शाळांत काही संस्था नफेखोरी करतात हे खरे; परंतु सर्वांबाबत सरसकट विधान करता येणार नाही. खासगी शाळा चालवितानाही अडचणी असून, करोनाच्या संकटामुळे त्यात वाढ झाली आहे. परिणामी गेल्या तीन वर्षांत राज्यातील बाराशेहून अधिक खासगी शाळा बंद पडल्या आहेत. शाळा– मग त्या सरकारी असोत की खासगी– बंद पडण्याकडे संवेदनशीलतेने पहायला हवे. एक शाळा बंद पडण्याने काहीशे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडचणी निर्माण होतात, त्यांपैकी काहींचे शिक्षण पूर्णपणे थांबण्याचा धोका असतो. त्यामुळे या खासगी शाळा का बंद पडल्या, याची कारणे शोधून ती दूर करण्याची आवश्यकता आहे. सरकारी शाळा असताना खासगी शाळा का, हा प्रश्न रास्त असला, तरी याचे उत्तर सुलभ नाही. विशेषत: महाराष्ट्रात खूप वर्षे खासगी शाळा आहेत. त्यांपैकी बहुतेकांना सरकारी अनुदान मिळत असे. गेल्या काही वर्षांत राज्य सरकारने 'कायमस्वरूपी विनाअनुदान'चे धोरण अवलंबले. त्यानुसार सुरू होणाऱ्या शाळांना 'स्वयंअर्थसहायित' म्हटले जात असून, त्या विद्यार्थ्यांच्या शुल्कावरच चालतात. त्यामुळे त्यांचे शुल्क अधिक असते. त्यांचे शुल्क निर्धारित करण्याचे धोरण असले, तरी प्रत्येक शाळांमधील शुल्क वेगवेगळे आहे. अतिश्रीमंतांच्या पंचतारांकित शाळा जशा आहेत, तशाच कनिष्ठ मध्यमवर्गाला परवडणाऱ्याही आहेत. गेल्या दोन दशकांत पालकांच्या आशा–आकांक्षांच्या आणि इंग्रजी माध्यमाच्या आकर्षणाच्या प्रमाणात खासगी शाळा वाढत गेल्या आहेत. कित्येक पालक पोटाला चिमटा घेऊन मुलांना खासगी शाळांत पाठवितात. जिल्हा परिषदेच्या वा पालिकेच्या काही शाळा दर्जेदार आणि प्रयोगशील असल्या, तरी असे सरसकट म्हणता येत नाही. त्यामुळे खासगी शाळांचे आकर्षण वाढते आहे. 'आरटीई'नुसार या शाळांत २५ टक्के आरक्षण असल्याने कमकुवत घटकांतील विद्यार्थ्यांना तिथे संधी मिळते आहे. या विद्यार्थ्यांपोटी सरकार शाळांना अनुदान देत असले, तरी ते वेळेवर मिळत नसल्याचा खासगी शाळांचा आरोप आहे. सुमारे नऊशे कोटी रुपयांची थकबाकी असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. या खेरीज करोनाकाळात अनेक पालकांनीही शुल्क भरले नसल्याकडे ते लक्ष वेधत आहेत. शुल्काची ही थकबाकी, करोनामुळे बिघडलेले आर्थिक गणित, काही पालकांची अरेरावी आणि सरकारचे एकतर्फी निर्णय यांमुळे शाळा बंद कराव्या लागत असल्याचे 'इंडिपेंडंट इंग्लिश स्कूल असोसिएशन' या खासगी चालकांच्या संघटनेचे म्हणणे आहे. मागणी तसा पुरवठा या बाजारपेठ तत्त्वानुसार खासगी इंग्रजी शाळांची वाढ झाली हे खरे. त्यांपैकी काही बंद पडत असतील, तर त्यामागे अर्थशास्त्रीय कारणे नक्कीच असतील; परंतु तरीही त्यांच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. सरकारी अनुदानाची थकबाकी हे महत्त्वाचे कारण असू शकते. सर्व सरकारी शाळांत उत्तम सुविधा झाल्या, शिक्षकांना वेळोवेळी प्रशिक्षण दिले आणि गुणवत्ता वाढीवर लक्ष केंद्रित केले, तर कदाचित पालकांचा खासगी शाळांकडील ओढा कमी होईल. मुलांना त्यांच्या घराजवळ असेल, अशा प्रकारे सरकारी शाळांचे जाळे विणल्यास 'आरटीई' अंतर्गत खासगी शाळांत जाणाऱ्यांची संख्या कमी होऊ शकेल. तसे झाल्यास अनुदानाची रक्कमही कमी होऊ शकेल. खासगी शाळांबाबत निर्णय घेताना संस्थाचालकांच्या संघटनांना विचारात घेणे आवश्यक आहे. खासगी शाळा नफेखोरी करणार नाहीत हे जरूर पाहावे; ज्या शाळा असे करतात त्यांना त्यापासून रोखावे. मात्र, त्याचबरोबर खासगी शाळांचे दुखणे समजून घ्यायला हवे. बाराशे ही मोठी संख्या असून, या बंद शाळांतील विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे काय होणार, याचा विचार व्हायला हवा. यांपैकी कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबणार नाही, यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज आहे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेलने उत्साहात साजरी केली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेल केंद्र हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असते. ह्याच अनुषंगाने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेलने बालग्राम, खांदा कॉलनी, पनवेल येथे मोठ्या उत्साहात भारतरत्न डॉ. बाबासाहेबआंबेडकर याची जयंती साजरी केली.याप्रसंगी शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. नीलिमा अरविंद मोरे, बँक ऑफ महाराष्ट्र, नवीन पनवेल शाखेचे विशेष सहाय्यक अरविंद मोरे, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे केंद्र प्रमुख, प्रवीण सकट, सहाय्यिका शोभा पाटील, बालग्रामचे अधीक्षक डॉ. विनायक पाटील व रेखा दीपक जाधव हे मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते अरविंद मोरे म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे सर्वच भारतीयांसाठी महान आहे. त्यांनीच खऱ्या अर्थाने समानता व लोकशाही आपल्या देशात रुजविली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना समानता प्राप्त करून दिली. त्यांनी कामगारांसाठी समान वेतन, समान कामाचे तास दिले. विशेष म्हणजे त्यांच्या वर एव्हढे अन्याय होऊन सुद्धा त्यांनी देशवासियांसाठी मोलाचे कार्य केले हे विशेष. ते ग्रंथप्रेमी होते. त्यांनी पुस्तकासाठी राजगृह घर बांधले. त्यांचे सर्वात मोठे उपकार भारतीयांसाठी असेल तर ते म्हणजे भारताची राज्यघटना होय. अरविंद मोरे पुढे म्हणाले की अजूनही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य सर्व नागरिकांपर्यंत पोहचलेले नाहीत. जर आपला देश सुजलाम सुफलाम करावयाचा असेल तर डॉ. बी. आर. आंबेडकरांचे कार्य हे प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहचविणे ही काळाची गरज आहे. या प्रसंगी त्यांनी तसा संकल्प ह्या मंगल दिनी करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे म्हणाल्या की, स्त्रियांना खऱ्या अर्थाने जर स्वतंत्र प्राप्त करून दिले असेल तर ते केवळ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच. अगोदरच्या काळी स्त्रियांचे जीवन हे खूपच हालापेष्टांचे होते. त्यातून स्त्रियांना बाहेर काढण्याचे काम डॉ. बी.आर. आंबेडकरांनीच केले. आज स्त्री स्वाभिमानाने व अभिमानाने आपल्या पायावर उभी राहिलेली आहे ती केवळ डॉ. बी. आर. आंबेडकरांमुळेच होय. खऱ्या अर्थाने सर्वच जाती, धर्मातील स्त्रिया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऋणी आहेत. डॉ. नीलिमा मोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी रमाबाई आंबेडकरांच्या बलिदानाची सुद्धा आठवण करून दिली. डॉ. नीलिमा अरविंद मोरे यांनी डॉ. बी. आर. आंबेडकरांनी जे शिक्षणाचे मूल्य रुजविले आणि आज जी शैक्षणिक क्रांती शिक्षणामुळे झाली ती डॉ. बी. आर. आंबेडकरांमुळेच. त्यांनी सुद्धा डॉ बी. आर. आंबेडकरांचे अध्ययन करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी अरविंद मोरे व डॉ नीलिमा अरविंद मोरे यांच्या तर्फे डॉ. बी. आर. आंबेडकरांची प्रतिमा, त्यांच्या जीवनावरील पुस्तके 'माझी आत्मकथा' व ग्रंथप्रेमी डॉ. बी. आर. आंबेडकर'बालग्राम ग्रंथालय, पनवेल व यश दीपक जाधव, उदय कांबळे, रेखा दीपक जाधव व मीनाक्षी अविनाश भाकरे याना भेट म्हणून देण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्र संचालन व आभार प्रदर्शन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, पनवेलचे केंद्र प्रमुख, प्रवीण सकट यांनी केले तर कार्यक्रम यशस्विते करिता सहाय्यिका शोभा पाटील यांनी अथक परिश्रम घेतले.



# क्रीडा गणवेशामुळे हरवलेल्या मुलाचा शोध; रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलचा क्रीडा गणवेश महत्त्वाचा ठरला दुवा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघरमधील गरीब कुटुंबातील १० वर्षीय मुलाला त्याच्या पालकांशी पुन्हा भेट घडवून देण्यासाठी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलचा क्रीडा गणवेश महत्त्वाचा दुवा ठरला आहे. मानसिक दृष्ट्या सक्षम नसलेल्या 'सोवित' नामक या मुलाने सोमवारी परराज्यातील ट्रेनमध्ये चढून मध्यप्रदेशात ५८० किमी प्रवास केला. युनिफॉर्म व्यतिरिक्त, प्रवाशाची सतर्कता आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या प्राचार्या राज अलोनी यांचा तडफदारपणा यामुळे मानसिकदृष्ट्या अस्थिर मुलाला ओळखण्यास आणि त्याच्या पालकाकडे सुखरूप सुपूर्द करण्यात महत्वाची मदत झाली.



दरम्यान सोमवारी वाराणसीला जा–ताना अरविंद पाठक या प्रवाशाला, रेल्वे कल्याणमधून पुढे रवाना झाल्यानंतर एक मुलगा पीटी युनिफॉर्म परिधान केलेला निदर्शनास आला. तो खेळकर होता. परंतु अनस्कॉर्ट केलेल्या मुलाला तो कोठे जात होता किंवा तो ट्रेनमध्ये का आला होता याचा काहीच पत्ता त्याला नव्हता, त्याच्याकडे सतत चौकशी केल्यानंतरही त्याला आपल्या आई–वडिलांचे एकेरी नाव व्यतिरिक्त कोणतीच माहिती देता येत नव्हती. फक्त पेठगाव असा तो उल्लेख करत होता. दरम्यान त्या मुलाने परिधान केलेल्या शाळेच्या क्रीडा गणवेशावर शाळेचे नाव असल्याने पाठक यांनी त्याला धीर दिला.

पाठक यांनी गणवेशावरील शाळेचा नाव गुगलमध्ये सर्च केला आणि संपर्क क्रमांक मिळविला. पण त्यावेळी रात्रीचे ९ वाजले होते, खूप उशीर झाल्यामुळे लँडलाइनकडून प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा पाठक यांना नव्हती. मात्र संपर्क केला असता त्यावेळी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या प्राचार्या राज अलोनी यांनी फोन उचलला. त्या शालेय कामकाज निमित्त विद्यालयात काम करत होत्या. त्यावेळी खुद्द प्राचार्यांनी लँडलाईन फोन उचलल्याने पाठक यांनी आश्चर्य व्यक्त केले. त्यांनी सर्व हकीगत राज अलोनी यांना सांगितली. विशेष म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी राज अलोनी यांच्या डोळ्यावर मुंबईत शस्त्रक्रिया होती. मात्र त्याचा कोणताही विचार न करता राज अलोनी यांनी सर्व कामे बाजूला सारून एका मिशन सारखे काम हाती घेतले. आणि यावेळी फोन नंबर्सची देवाणघेवाण झाली, त्यानंतर मुलाचा फोटो पाठविण्यात आला तसेच त्याच्या क्रीडा गणवेशावर 'बस मार्ग ५' असा टॅग होता तो अध–रेखित करण्यात आला होता. त्यानुसार प्राचार्य राज अलोनी यांनी मिशन प्रमाणे यावर काम करायला सुरुवात केली. त्यांनी मार्ग क्रमांक ५ वरील स्कूल बसच्या चालकाशी संपर्क साधला पण ड्रायव्हरला मुलाचा चेहरा ओळखीचा असल्याची खात्री नव्हती. मुलाचे फोटो शाळेच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर करण्यात आले. एकाही शिक्षकाला त्याची ओळख पटली नाही. तरीही, ऑनलाइन शालेय शिक्षणाच्या काळातील एक शंका निर्माण झाली होती, त्यामुळे राज अलोनी यांनी शाळेतील विद्यार्थी असण्याची शक्यता नाकारली नाही, जी कदाचित या कोरोना काळामुळे बस चालक किंवा शिक्षकांना ओळखत नसेल. शेवटी पाठक यांच्या भ्रमणध्वनीवर मुलाशी बोलले असता, त्या मुलाला शाळेबद्दल काहीच माहिती नसल्याचे समजले. या सर्व प्रक्रियेत हा मुलगा रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलचा विद्यार्थी नसल्याचे स्पष्ट झाले होते. मात्र तरीही प्राचार्यांनी सर्व काम बाजूला ठेवून त्याचा पाठपुरावा केला. दरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांना सदरचे वृत्त कळताच त्यांनी पेठ गावातील भाजप कार्यकर्ते प्रभाकर जोशी यांच्याशी संपर्क साधून पेठ गावात पालकांचा शोध घेण्यासाठी सांगितले होते.

राज अलोनी यांनी भुसावळ येथील रेल्वे कर्मचार्यांशी समन्वय साधला, मात्र तोपर्यंत ट्रेन स्टेशनवरून निघून गेली होती. त्यानंतर त्यांनी खारघर पोलिस ठाण्याच्या संपर्कात येऊन मुलाचे फोटो शेअर केले. वरिष्ठ निरीक्षक जीतू म्हात्रे यांनी रेल्वे पोलिसांशी समन्वय साधला. खांडवा स्थानकावर मंगळवारी पहाटे ट्रेन थांबवण्यात आली, तिथे रेल्वे पोलिसांनी मुलाला ताब्यात घेतले आणि तसा संदेश खांडवा येथील भाजप कार्यकर्त्याकडून आला. तोपर्यंत, रेल्वे प्रवाशांनी हरवलेल्या मुलाकडे लक्ष दिले, त्याला अन्न आणि पाणी दिले. या सर्व प्रकारात मुलाच्या पालकांनी खारघर येथे बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती. या मुलाचे पालक घरकाम करून उदरनिर्वाह करीत आहेत, ज्या ठिकाणी हे काम करीत होते. तेथील मालकाने आपल्या मुलांचे जुने कपडे त्यांच्या कामगारांना दिले होते. त्यातील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलचा क्रीडा गणवेश घालून सोमवारी सकाळी सोवित खारघर येथून जवळच्या पेठगाव येथे आजीकडे गेला होता, मात्र दुपारपर्यंत तो परतला नाही.

मुलाची मानसिक अस्थिरता असल्याचे आईने सांगितले होते. प्राचार्य राज अलोनी यांचा या संदर्भातील पाठपुरावा तसेच अरविंद पाठक यांची समयसूचकता आणि शालेय क्रीडा गणवेश १० वर्षीय मुलाला त्याच्या पालकांना परत मिळवून देण्यासाठी महत्वपूर्ण ठरली असून त्याला घरी परत आणण्यासाठी त्याचे आई–वडील रेल्वेने खांडवा येथे रवाना झाले असून मानसिकदृष्ट्या अस्थिर असलेल्या या मुलाच्या अंगात क्रीडा गणवेश नसता तर कदाचित या मुलाचा शोध घेणे कठीण झाले असते हे नक्कीच. या मुलाला मिशन प्रमाणे शोधण्यात महत्वाची कामगिरी बजावल्याबद्दल प्राचार्या राज अलोनी, प्रवासी अरविंद पाठक तसेच पोलिसांचे सोशल मीडियावर आभार व्यक्त केले जात आहेत.

# बेपत्ता मुलीचा शिताफीने शोध घेऊन आई- वडिलांकडे सुपूर्द

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील सारडे, बेलवाडी आदिवासी वाडीवरील मुलगी अस्मिता गुरूनाथ कातकरी २० – २५ दिवसांपासून बेपत्ता होती. या संदर्भातील फिर्याद तिच्या आईने उरण पोलिस ठाण्यात करण्यात आली होती. आपल्या मुलीचा शोध घेण्याची कळकळीची विनंती सदरहू महीलेने उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पाटील यांच्याकडे केली होती उरण पोलिस ठाण्यासमोर हे मोठे आव्हान होते.

मुलीचा कुठल्याही प्रकारचा ठावठिकाणा मिळत नव्हता . याच दरम्यान सदरहू बेपत्ता झालेल्या मुलीने तीच्या आईशी मोबाईल द्वारे संपर्क साधला. हाच धागा पकडून वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांनी सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल राजवाडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार केले. राजवाडे यांनी बेपत्ता मुलीच्या मोबाईलचे लोकेशन ट्रेस करून आपल्या सहकाऱ्यांसह उत्तर प्रदेशातील लखनौ शहर गाठले. या पथकाने अविरत मेहनत घेऊन अखेर सदरहू मुलीला लखनौ शहरातून ताब्यात घेऊन उरण येथे सुखरुप आणले.

उरण पोलिस ठाण्याच्या या स्पृहणिय कामगिरीबद्दल उरण पोलिस ठाण्यातील अधिकार्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. उरण सामाजिक संस्थेतर्फे संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, सरचिटणीस संतोष पवार, प्रा. राजेंद्र मढवी, शेखर पाटील, मधूकर भोईर यांच्या हस्ते वरिष्ठ पोलिस निरिक्षक सुनिल पाटील, सहाय्यक पोलिस निरिक्षक राजवाडे, आणि ईतर अधिकारी यांचे प्रत्यक्ष भेटून अभिनंदन केले.

# महिलांसाठी गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरच्या मोफत तपासणी शिबीराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराईज, पनवेल होरायझन, खारघर मिडटाऊन आणि कलंबोली आणि शुभद द ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी गर्भाशयाच्या मुखाचे कॅन्सर तपासणी शिबीराचे आयोजन रविवार दिनांक १७ एप्रिल २०२२ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ या दरम्यान खालील ठिकाणी दिलेल्या वेळेत आयोजित केले आहे.

या संपूर्ण तपासणी आणि टेस्ट चे रुपये २५००/– होतात परंतु हे शिबीर संपूर्णपणे मोफत असणार आहे याची नोंद घ्यावी. या शिबीरात स्तनांमध्ये असलेल्या गाठी याची तपासणी, पँप स्मिअर टेस्ट, स्त्री रोग तज्ञ (गायनेकॉलॉजिस्ट डॉक्टर) यांकडून तपासणी करण्यात येणार आहे तरी जास्तीत जास्त महिलांनी या शिबीरात आपली नावे नोंदवावीत.

शिबिराच्या वेळा आणि ठिकाणे; १) सकाळी १०.३०ते ११.३० – अष्टविनायक हॉस्पिटल, सेक्टर ६, खांदा कॉलनी २) दु. १२ ते दु. १ वाजेपर्यंत अंत्यविधी सेवा संस्था, सुकापूर ३) दु. १.३० ते २.३० पर्यंत संत रोहिदास विकास मंडळ संचालित जेष्ठ नागरिक कट्टा, आमराई गार्डन, सी के टी कोलेज बाजूला, नविन पनवेल ४) दु. ३.३० ते ५ – नील आशिमा सोसायटी, सेक्टर २ ए, प्लॉट नं १५, करंजाडे. पूर्व नाव नोंदणी आवश्यक् संपर्क: रो रुपेश यादव ९८३३१०४४८७, रो. डॉ. किरण कल्याणकर ८८९८६३०८३१, रो. स्वप्नील गांधी ९८३३३३२३३३, रो. दिलीप महाडिक ८९७६६१७४०४ येथे संपर्क साधावा.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## संदीप गोडबोलेची १६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी

शरद पवार यांच्या मुंबईतील 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानावरील हल्ल्यापूर्वी एसटी कामगारांचे वकील ॲड गुणरत्न सदार्वेत यांनी व्हॉट्सअॅपवर नागपुरातील व्यक्तीसोबत दोन वेळा संवाद साधल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. त्यानंतर हा नागपूकर कोण? याची चर्चा सुरू झाली. मुंबई पोलिसांनी सदार्वेत यांनी व्हॉट्सअॅप कॉल केलेल्या नागपूकराचे लोकेशन शोधले. त्याची माहिती काढली. तो क्रमांक संदीप गोडबोले यांचा असल्याचे निष्पन्न झाले. मुंबई पोलिसांनी गणेशपेठ पोलिसांच्या मदतील गोडबोले यांना अटक केली होती.

## नावडे फाटा उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्याने वाहतूक कोंडीतून होणार सुटका

अवजड वाहनांची नेहमी वर्दळ असते. त्यात नावडे फाटा येथून तळोजा औद्योगिक क्षेत्रात जाण्यासाठी एकमेव मार्ग असल्यामुळे नावडे फाट्यावर नेहमी वाहतूक कोंडी होते. तसेच रस्त्यालगत असलेली शाळा, नावडे गाव आणि वसाहती मधील नागरिकांना रस्ता ओलांडण्यासाठी करावी लागणारी कसरत, वाहतूक कोंडीमुळे होणाऱ्या किरकोळ अपघाताच्या वाढत्या घटनांची नोंद घेवून ३ वर्षांपूर्वी ७० कोटी रुपये खर्च करुन 'एमएसआरडीसी'ने नावडे फाटा येथे उड्डाण पुलाचे बांधकाम सुरु केले होते. दोन वर्षात काम पूर्ण करून पूल वाहतुकीसाठी खुला करण्याचा संकल्प करण्यात आला होता. मात्र, 'कोरोना' मुळे लागू करण्यात आलेली टाळेबंदी आणि नावडे ग्रामस्थांना गावातून बाहेर पाडण्यासाठी भुयारी मार्गाचे काम हाती घेण्यात यावे यासाठी ग्रामस्थांनी केलेल्या आंदोलनामुळे काही दिवस उड्डाणपुलाचे काम बंद होते. अखेर नावडे गावालगत पादचारी भुयारी मार्ग उभारण्याचा निर्णय घेवून सुरु झालेले उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उड्डाणपुलावर दोन्ही बाजूला जवळपास नव्वद पथदिवे उभारण्यात आले आहेत. उडाणपुलाचे काम पूर्ण झाल्यामुळे नावडे फाटा येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका होणार असल्याने नावडे परिसरातील रहिवासी आणि वाहन चालक समाधान व्यक्त करीत आहेत. दरम्यान, नावडे फाटा येथील उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. येत्या आठवडाभरात पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे, असे एमएसआरडीसी अधिकाऱ्यांनी सांगितले.

नावडे उड्डाणपुलामुळे थेट येणारी वाहने रोडपाली सिग्नलवर थांबणार आहेत. त्यामुळे चारही बाजूने येणाऱ्या वाहनांमुळे सदर सिग्नलवर वाहतूक कोंडी होणार आहे. त्यामुळे शासनाने रोडपाली सिंग्नलवर उड्डाणपुल उभारावा, या मागणीचे पत्र नवी मुंबई पोलीस उपायुक्त यांच्याकडून शासनाकडे पाठविण्यात आले आहे.

## कर्जत नगरपरिषद हद्दीमध्ये गॅस्ट्रोचे रुग

जलशुद्धीकरण केंद्रावर भेट दिली असता तिथं सर्व यंत्रणा व्यवस्थित चालू असल्याचे निदर्शनास आले. क्लोरीनची मात्रा पण व्यवस्थित दिले जात आहेत.

नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घेणे जरुरी आहे त्यासाठी पाणी उकळून व गाळून प्यावे असे आवाहन सोशल मीडियावर केले, याबाबत रिक्षा फिरवून लोकांना आवाहन करण्यात येत आहे, तसेच तिव्र उन्हा पासून काळजी घ्यावी असे सांगण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांची भेट घेऊन विचारपूस केली तसेच रुग्णालयाचे अधिक्षक डॉ मनोज बनसोडे यांच्याशी चर्चा केली. याप्रसंगी त्यांच्या समवेत नगरपरिषदेचे सुदाम म्हसे, पाणीपुरवठा विभागाचे हरिश्चंद्र वाघमारे, विलास गायकवाड, मालू निरगुडा उपस्थित होते.

# उमरोली रस्त्याचे काम पूर्ण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या कित्येक दिवसांपासून रखडलेले उमरोली गावात जाणारया रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांचे मार्गदर्शनाखाली महाराजस्व अभियान राबवले जात आहे. महाराजस्व अभियान अंतर्गत शेत रस्ते, शिवार रस्ते, गाव रस्ते खुले करण्याच्या मोहिमेमध्ये मामलेदार कोर्ट ऍक्ट १९०६ चे कलम ५ अन्वये उमरोली येथील रस्ता खुला करणेबाबत पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्यातर्फे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार गेल्या काही वर्षापासुन निधी मंजूर होऊन देखील उमरोली येथील रस्त्याचे काम सुरू होत नव्हते. या रस्त्यावर करण्यात आलेला अडथळा काढून टाकण्याचे आदेश पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी काही महिन्यांपूर्वी दिले होते. टेमघर ते उमरोली रस्ता दुरुस्त करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या जिल्हा परिषद रायगड– अलिबाग फंडातून निधी मंजूर झाला होता. तहसीलदार यांच्या आदेशानंतर कामाला काही दिवसांपूर्वी सुरुवात करण्यात आली. उमरोलीचा सिमेंट काँक्रिटीकरणचा ३०० मीटरचा हा रस्ता असून रस्ता पूर्ण होण्यात असंख्य अडचणी येत होत्या. या सर्वांवर मात करत हा रस्ता पूर्ण झाल्याने रहिवासी, ग्रामस्थ समाधान व्यक्त करत आहेत.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## को ए सो के वी कन्या विद्यालय पनवेल शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

को.ए.सो. केशवजी वीरजी कन्या विद्यालय पनवेल शाळेत महामानव, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांनीचे भाषण, नाटिका व गीत गायन यासारखे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महेश साळुंखे यांनी लावली विविध ठिकाणी उपस्थिती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसह पनवेल, नवीन पनवेल, वडघर, करंजाडे, कामोठे व विविध ठिकाणी भेटी देवून अभिवादन केले आहे.

आज सकाळी पनवेल शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास हार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. त्यानंतर आंबेडकर भवन येथील कार्यक्रमास उपस्थिती लावली. तसेच पंचशिल नगर, शिवाजी नगर, करंजाडे, वडघर, ओवळे, जासई अशा विविध ठिकाणावरील जयंती महोत्सवाला हजेरी लावून बाबासाहेबांना अभिवादन केले.

त्याचप्रमाणे पनवेल महानगरपालिका आयोजित महोत्सव कार्यक्रमात महत्वपूर्ण सुचना मांडली ती म्हणजे महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले व छत्रपती शाहू महाराज जयंती सुद्धा अशाच प्रकारे सर्वांनी एकत्र येवून साजरी करावी.



**महावीर जयंती निमित्त पनवेलमध्ये मिरवणूक पार पडली. यामध्ये भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर तसेच शहराध्यक्ष जयंत पगडे, समाजबांधव, नागरिक सहभागी झाले होते.**

## गांजा विकणाऱ्या महिलेला अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेलपाडावाडी येथे गांजा विक्री करणाऱ्या महिलेस पोलिसांनी अटक करून १४ हजारांचा ५५० ग्रॅम गांजा हस्तगत केला.

खारघरमध्ये गांजा विक्री की होत असल्याची माहिती अमली विरोधी पथकाला मिळाली होती. पथकाने धाड टाकून गांजा विक्री करणाऱ्या एका महिलेस अटक केली. बेलपाडा वाडीलगतच्या डोंगरावर मोठ्या प्रमाणात अनधिकृत झोपड्या उभारण्यात आल्या आहेत. याठिकाणी बेकायदा व्यवसाय होत असल्याने सिडको आणि महापालिका प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

## दारू विकणाऱ्यावर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील आदई या ठिकाणी बेकायदेशीर रित्या विनापरवाना दारू विक्री करण्याऱ्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे.

पोलिसांनी आयुक्तालय क्षेत्रात विनापरवाना दारू विकणाऱ्यांवर कारवाई सुरु केली आहे. आदई गावात घरक्रमांक ११६ च्या बाजूला एक व्यक्ती दारू विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे छापा टाकून दारूच्या २२ बाटल्या जप्त केल्या आहेत.

याबाबत खांदेश्वर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आता आहे.

# वॉल्व बदलण्यासाठी पाणी पुरवठा होणार खंडीत, पाणी साठवून ठेवा : नगरपंचायत माणगांव

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगर पंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, उतेखोल येथिल जलशुध्दी केंद्रातील पाणी पुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकी जवळील मुख्यलाईनचे वॉल्व लिकेज असल्यामुळे सोमवार दिनांक १८ एप्रिल व मंगळवार दिनांक १९ एप्रिल २०२२ असे दोन दिवस, वाल्व बदली करण्याचे मोठे काम करावयाचे असल्याने, पाणी पुरवठा नियोजीतपणे बंद ठेवण्यात येणार आहे. ह्याची नोंद समस्त माणगांवकरांनी घ्यावी.



या कालावधित आपल्या दैनंदिन वापरा साठी दोन दिवस पुरेल इतका पुरेसा पाणीसाठा करून ठेवावा. अशी विनंती माणगांव नगर पंचायती मार्फत सोशल माध्यमावर संदेश व ध्वनीफिती द्वारे करण्यात आली असुन पाणी पुरवठा सभापती राजेश मेहता यांनी माणगांव वासियांकडुन सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. सध्या लोडशेडिंगची टांगती तलवार, मिती असुन सर्वांनी योग्य ती खबरदारी घेऊन आपल्या घरात दोन दिवस पुरेल इतके पाणी साठवुन ठेऊन ते जपून वापरावे. सध्या कडक उन्हाळ्याचे दिवस असुन पाणी हे जीवन आहे, यासाठी आगाऊ काळजी घ्यावी. पाणी पुरवठा सभापती तसेच सर्वच नगरसेवकांनी त्यांचे व्यक्तिगत माध्यमातून सोशल समुहावर तसे संदेश सुध्दा जारी केले आहेत. माणगांव नगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार व उप नगराध्यक्ष, पाणी पूरवठा सभापती तसेच त्यांचे सर्व सहकारी नगर सेवक व नगर पंचायत मुख्याधिकारी, ज्युनियर इंजिनियर तसेच सर्व पाणी पूरवठा कर्मचारी यांनी माणगांवकरांना सर्व समावेशक स्वच्छ व पूरेशा दाबाने पाणीपूरवठा होण्याचे दृष्टीकोनातून नुकतेच प्रत्येक प्रभागात जाऊन पाहणी दौरा केला असुन योग्य ते नियोजनासाठी गळती काढण्याचे मोठे काम हाती घेतले आहे.

# सौरऊर्जेचे चालू दिवे दाखवा आणि बक्षीस मिळवा स्पर्धेचे मानकरी अप्पा कदम यांचा सत्कार !

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील काही दिवसांपासून सोशल मीडियावर सौरऊर्जेचे चालू दिवे दाखवा आणि बक्षीस मिळवा ही एक छोटीशी स्पर्धा येथील उद्योजक भास्कर शिंदे यांनी आयोजित केली होती. यामध्ये माजी नगरसेवक नारायण(अप्पा) कदम,आणि व्यापारी गिरीष पवार यांनी जिंकली होती. वन ट्री हिल पॉईंट भागात एक सौरऊर्जेचा दिवा उजेडात असल्याचे फोटो अप्पा कदम यांनी तर पंचवटी नगर येथील दोन सौरऊर्जेचे दिवे चालू अवस्थेत असल्याचे फोटो त्यांनी सोशल मीडियावर व्हायरल केले होते.एक चालू दिवा दाखविणाऱ्यांना एकहजार रुपयांचे बक्षीस भास्कर शिंदे यांनी जाहीर केले होते त्यानुसार ह्या बक्षिसाचे वितरण गोकुळ रेस्टॉरंट येथे पार पडले. अप्पा कदम यांना एकहजार रुपये रोख आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार कपाडिया मार्केटचे अध्यक्ष मंगेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विनोद कदम, मनोहर चाळके, मनोज चव्हाण, अमोल काळे, सचिन सोरटे, अमोल चौगुले, विठ्ठल पवार, आदी उपस्थित होते.




माथेरान मध्ये जवळपास सत्तर पेक्षाही अधिक प्रमाणात नगरपरिषदेच्या माध्यमातून ठेकेदारामार्फत लाखो रुपये खर्च करून सौरऊर्जेचे दिवे लावण्यात आले होते. परंतु हे दिवे चालू अवस्थेत नसून अनेक ठिकाणी या प्रकल्पाच्या बॅटरी ,दिवे गायब झाले होते त्यामुळे अंधारातून प्रवास करताना स्थानिकांना त्याचप्रमाणे पर्यटकांना खूपच त्रासदायक बनले होते याबाबतीत वारंवार तक्रारी येत होत्या. संबंधित अधिकारी वर्गाला सुध्दा याबाबतीत जागरूक नागरिकांनी कळविले होते परंतु सदरची बाब गांभीर्याने घेतली गेली नव्हती. त्यामुळे एक शेवटचा पर्याय म्हणून उद्योजक भास्कर शिंदेंनी सोशल मिडियाचा आधार घेऊन सौरऊर्जेचे चालू दिवे दाखवा आणि बक्षीस मिळवा ही स्पर्धा आयोजित केली होती यामध्ये अप्पा कदम आणि गिरीश पवार या दोन जागरूक नागरिकांनी सत्तर सौरऊर्जेच्या दिव्यापैकी फक्त तीन दिवे चालू असल्याबाबत धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे त्यामुळे संबंधीत ठेकेदाराने याबाबतीत कामे पूर्ण करताना कशाप्रकारे नियोजन केले होते आणि या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे प्रशासनाने सुध्दा का डोळेझाक केली आहे याबाबत तर्कवितर्क लढविले जात आहेत.तर यापुढेही अन्य कामे अर्थातच सीसीटीव्ही कॅमेरे किती चालू आहेत ते दाखवा आणि बक्षिसे मिळवा ही स्पर्धा सुद्धा लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. यावेळी नारायण कदम यांनी सांगितले की, सौरऊर्जेचा हा सुंदर प्रकल्प माथेरान मध्ये अमलात आणला गेला ही बाब इथल्या पर्यटनाच्या दृष्टीने खूपच चांगली होती. एवढ्या सौरऊर्जेच्या दिव्यांपैकी केवळ तीन दिवे चालु आहेत. ही बाब आम्ही जनतेच्या निदर्शनास आणून दिली आहे याप्रमाणे सर्व नागरिकांनी अशाचप्रकारे जिथे विकासाच्या नावाखाली काही अनुचित घडत असेल ते जनतेच्या समोर आणणे आवश्यक आहे. यासाठी सर्व माथेरान करांनी जागरुकता दाखवावी.

तर यावेळी मंगेश शिंदे म्हणाले की, आम्ही माजी नगराध्यक्षाना याबाबत माहिती दिली होती की गावातील अनेक ठिकाणी सौरऊर्जेचे दिवे बंद अवस्थेत आहेत नागरिकांच्या तक्रारी येत आहेत परंतु त्यांनी याकडे दुर्लक्ष केले होते.निदान यापुढेही जागरूक नागरिकांनी माथेरानच्या विकास कामात स्वेच्छेने पुढाकार घेऊन ज्या काही अडीअडचणी असतील, आपल्या भागात उद्भवणाऱ्या समस्या असतील त्या सोशल मीडियावर कळविल्यास नक्कीच त्यातून मार्ग निघू शकतो.

तसेच भास्कर शिंदे यांनी सांगितले की, माथेरान नगरपरिषदेच्या तत्कालिन सत्ताधार्यांनी टेंडर काढली आणि त्यातून फक्त स्वहित साधलेले आहे. या एकमेव उद्देशाने काम केली गेली.ती कुठेही टिकाऊ नव्हती हे यातुन स्पष्ट होतेय.सौरसोलर पॅनल लाखो रुपयाचा चुराडा करुन बनवले परंतु त्याची नियमीत देखभाल हि ठेकेदाराकडुन करुन न घेतल्याने आज जनतेचा लाखो रुपये कर रुपी पैसा पाण्यात गेलाय ही खुप दुःखदायक बाब आहे.

# किरकोळ वादातून दगडाने केली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तु माझ्या भावाला त्रास का देतो या बोलाचालीतून पूर्वीचा राग मनात धरुन शिवीगाळ करून आरोपीने जवळ असलेला दगड उचलून समोरच्याच्या डोक्यात मारुन त्याच्या डोक्याच्या डाव्या बाजूस दुखापत तसेच नाकास किरकोळ स्वरुपाची दुखापत केल्याचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आला आहे. अविराज यादव (२१) नवनाथ नगर याला आरोपी शकील शेख याने त्याच्या घराबाहेर बोलावून तु माझ्या भावाला त्रास का देतो असे बोलून पूर्वीचा राग मनात धरुन शिवीगाळ करून जवळ असलेला दगड उचलून शकील याने अविराज याच्या डोक्यात मारुन त्याला जखमी केल्याने तसेच त्याला शिवीगाळ केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्रीमती.पार्वती गुरुनाथ पाटील व इतर ७ यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देण्यात येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत मुळ कागदपत्रानिशी आमचे खालील पत्यावर येवून खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजरहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट** : तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका : उरण, मे.दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा : रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे : पिरकोन येथील मिळकत भूमापन / सर्व्हे नं.६७/७५, एकूण क्षेत्र ०० हेक्टर ०५ आर ०० प्रति यांसी आकार रक्कम रुपये ०.१६ पैसे यांसी चतुःसिमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त.

दि.१५ एप्रिल २०२२

**सही/-**
**श्री.विनायक ताम्हणकर, वकील**
**खरेदीदारातर्फे वकील**
**पत्ता : ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र.८६६८५५१३१२**

# ग्रुप ग्रामपंचायत चिपळे

ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा

दि.१४/०४/२०२२

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत चिपळे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१५/०४/२०२२ ते २१/०४/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२२/०४/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मौजे चिपळे ग्रामपंचायत मुख्य रस्ता ते विनायक कॉम्लेक्स पर्यंत पाईप गटार काढणे | ५००००० | ग्रामनिधी |
| २ | मौजे विहिघर येथील किसन फडके ते राम फडके यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | ४००००० | ग्रामनिधी |
| ३ | मौजे चिपळे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व स्मशानभूमी सुशोभिकरण करणे | ५००००० | ग्रामनिधी |
| ४ | मौजे विहिघर ते माथेरान रोड पर्यंत रस्त्याला साईडपट्टी भरणे | २००००० | ग्रामनिधी |
| ५ | मौजे कोप्रोली येथील शंकर मंदिर परिसर काँक्रीटीकरण करणे | ३००००० | ग्रामनिधी |
| ६ | मौजे भोकरपाडा मंदिराच्या बाजूची बोअरवेल दुरुस्त करणे | ८०००० | ग्रामनिधी |
| ७ | मौजे चिपळे येथील शिकारा व अनुविल्ला सोसायटी गेट समोर काँक्रीटीकरण करणे | २५०००० | ग्रामनिधी |
| ८ | मौजे विहिघर येथील तुकाराम फडके ते अरुण फडके ते नाथा फडके चिपळे ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत स्ट्रीट लाईट लावणे | ३००००० | ग्रामनिधी |
| ९ | मौजे विहिघर येथील अरुण फडके व नाथा फडके यांच्या घरापर्यंत रस्ता करणे | ४५०००० | ग्रामनिधी |
| १० | मौजे बोनशेत येथील आत्माराम फडके ते स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता करणे | ६००००० | ग्रामनिधी |
| ११ | मौजे कोप्रोली येथील अंगणवाडीसाठी पत्राशेड बसविणे | १८०००० | ग्रामनिधी |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये ५०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**

# भगवान महावीरांचा पालखी सोहळा नागोठण्यात उत्साहात

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

भगवान महाविर यांच्या जयंती निमित्त नागोठण्यात काढण्यात आलेला पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या पालखी सोहळ्यात जैन बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नागोठण्यातील जैन मंदिरापासून निघालेल्या या पालखीचे बाजारपेठ, छ. शिवाजी महाराज चौक मार्गे नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयासमोर आगमन झाले असता नागोठण्याचे उपसरपंच मोहन नागोठणेकर यांनी पालखीचे स्वागत केले.

यावेळी किशोरशेठ जैन, नरेंद्रशेठ जैन, नागोठणे ग्रामपंचायत सदस्य सुरेशशेठ जैन, सर्व जैन समाज बांधव, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच नागोठणेकर ग्रामस्थ उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे अशिलांने प्रस्ताविक जमीन मालक **१) श्री.शंकर धाया पाटील २) पार्वती तुकाराम पाटील ३) लता तुकाराम पाटील ४) भरत तुकाराम पाटील ५) मधुकर तुकाराम पाटील ६) रुपेश तुकाराम पाटील ७) काशिनाथ तुकाराम पाटील ८) रमेश तुकाराम पाटील ९) केसव तुकाराम पाटील १०) अनुसया शेखर कोळी ११) नंदा मुकेश वाधिलकर** या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : केळवणे (५५३५०१), तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | भूमापन नं. / उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| केळवणे | १७/२/ब | ०-१३-७० पो.ख. ०-०१-५० एकूण ०-१५-२० | २.१९ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकरचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.१४/०४/२०२२

**सही/-**
**ॲड.दिपक आर. शेळके**
**डी-३/१, किनारा हौ.सो., बावन बंगलो, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०७९५६०५**

मा.मुजावर साहेब कोर्ट
प्रो.जमा.६-२५

अर्जदाराचे वकील : ॲड.दिनेश द. पाटील
ॲड.करिष्मा श. म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.५१२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०६/२०२२

**कै.ज्ञानेश्वर संतु नरवडे (मयत तर्फे वारस)**
**१) श्रीमती.विमल नामदेव नरवडे**
वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
**२) श्री.चेतन ज्ञानेश्वर नरवडे**
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार क्रं.१ व २ :- केएल-५/२०/११, एनएमएमटी बस डेपो जवळ, सेक्टर २, कळंबोली नोड, ता.पनवेल, जि.रायगड
**३) श्रीमती.सोनाली सुहास शेंडकर**
वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.१३४/७ शिवदर्शन वसाहत मुक्तागंन स्कूल पुणे शहर, पर्वती पुणे शहर पिन नं.४११००९ ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाला

ज्याअर्थी **कै.ज्ञानेश्वर संतु नरवडे** हे दि.०८/०३/२०१५ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे मयत झाले असून मयत **कै.ज्ञानेश्वर संतु नरवडे** यांची मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड हद्दीतील खालील वर्णनित निवासी सदनिका आहे तिचे वर्णन खालीलपमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सदनिकेचे वर्णन |
|---|
| बिल्डींग नं.के.एल/५/२०, रुम नं.११, दुसरा मजला, सेक्टर ०२, प्लॉट नं.२/४, (बिल्टअप क्षेत्रफळ ३३.२१ स्क्वेअर मी., कारपेट क्षेत्रफळ २४.४५ स्क्वेअर मी., बिल्टअप क्षेत्रफळ ३५७.३४ स्क्वेअर फुट) कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड |

यानंतर सदरहू स्थावर मिळकतीस संक्षिप्ततेसाठी **''सदर अर्ज मिळकत''** असे संबोधण्यात येईल.

**कै.ज्ञानेश्वर संतु नरवडे** यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १३/०४/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## मोबाइलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्रिकेट खेळण्यासाठी सिमेंटच्या कट्ट्यावर ठेवलेल्या मोबईलची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना घडली आहे. पनवेलमधील करेजाडे येथील रोहन खाडे व त्याचा मावसभाऊ मंदार कारले क्रिकेट खेळण्यासाठी व्ही. के. हायस्कूलच्या मैदानावर गेले होते. दोघांनीही तेथील सिमेंट कट्यावर त्यांचे मोबाइल ठेवले होते. अद्यात चोरट्याने सदर मोबाइल ज्याची किंमत ३८ हजार रुपये आहे चोरून नेले आहेत.

## जगाची घडी बसविणाऱ्या महामानवास म्हसळ्यात अभिवादन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त भारतीय बौध्द महासभा,म्हसळा तालुका शाखेच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभेच्या समता सैनिक दलाच्या माध्यमातून काढलेल्या मिरवणुकीत लहानथोर समाज बांधव उन्हातान्हाची पर्वा न करता उत्साहात सहभागी झाल्याचे दृश्य शहरात पाहावयास मिळाले. जयंती निमित्त म्हसळा येथील घनसार कॉम्प्लेक्स मध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात महामानवाला अभिवादन करण्यात आले.तत्पूर्वी महामानवास मिरवणूकीच्या माध्यमातून ध्वजारोहण व मानवंदना देण्यात आली. या प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.सर्व केंद्रीय शिक्षिका यांच्यावतीने, सभागृहात धार्मिक पुजा–पाठ विधी संपन्न करण्यात आला. यांनी तिन्ही आदर्शवत असणाऱ्या चक्रवर्ती सम्राट अशोक , महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल अत्यंत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयातही डॉ. महामानव बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारीत मनोगत व्यक्त करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजासाठी केलेला त्याग व तरुणांनी त्यापासून घेण्याचा आदर्श याबाबत मार्गदर्शन केले.म्हसळा तहसील कार्यालयात निवासी नायब तहसीलदार के. टी. भिंगारे यांनी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून आदरांजली वाहिली. याप्रसंगी नायब तहसीलदार पाटिल, वनविभागातील कोसबे अण्णा आदि मान्यवर उपस्थित होते.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# उपजिल्हा रुग्णालयात सुईणींची नेमणूक करावी : उदय पाटील

**दै.रायगड नगरी । कर्जत**



गोरगरिबांना योग्य त्या आरोग्य सुविधा मिळाव्यात म्हणून शासनाने ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे बांधली.कर्जत सारख्या आदिवासी बहुल भागात कशेळे येथे ग्रामीण रुग्णालय आणि कर्जत येथे उपजिल्हा रुग्णालय बांधले.आरोग्य व्यवस्थेवर शासन दरवर्षी करोडो रुपये खर्च करते.येथील डॉक्टरांना लाखाच्या आसपास तर, नर्स आणि आरोग्य सेविकांना पन्नास हजाराच्या आसपास पगार दिला जातो.पण शासनाचा पैसा योग्य मार्गी लागतो का? गोरगरिबांना नक्की आरोग्य सुविधा मिळतात का ? या बाबत ना प्रशासनाचे, लोकप्रतिनिधींचे लक्ष नाही, सर्व व्यवस्थाच बेभरवशाचा झाली आहे अशी प्रतिक्रिया कर्जत तालुका समन्वय समिती सदस्य उदय पाटील यांनी सोशल मिडिया टाकली आहे.

कर्जत मधील डॉक्टर दिवसभरात हजारोंचा गल्ला जमवतात पण रात्री दवाखान्याच्या ठिकाणी न राहता दूरच्या शहरातील फ्लॅटवर कुटुंबासह राहण्यास जातात. रात्री अपरात्री एखादा पेशंट आजारी पडला तर त्याचे नातेवाईक पेशंटला प्रत्येक दवाखान्यात उपचारासाठी घेवून फिरवतात.शेवटचा प्रयत्न म्हणून सरकारी रुग्णालय गाठतात. पण तेथेही रात्री डॉक्टर उपलब्ध नसल्याने बहुमूल्य तास दिडतास वाया घालवून पनवेल किंवा उल्हासनगर, ठाणे, मुंबई येथे रुग्णाला घेऊन जातात.यात महत्वाचा वेळ, खर्च झाल्याने परिस्तिथी हाता बाहेर गेलेली असते.

गरोदर स्त्रियांची डिलिव्हरी हा तर फारच गंभीर विषय आहे. गरोदरपणाच्या काळात सरकारी दवाखान्यात सर्व तपासण्या होतात. नॉर्मल डिलिव्हरी होईल असे सांगतात. परंतु प्रत्यक्ष डिलिव्हरी ची वेळ आली की सरकारी दवाखान्यातील कोणीही नर्स किंवा डॉक्टर त्या स्त्रीला दाखल करून घेत नाही. मूल आडवे आहे किंवा इतर काहीतरी कारण सांगून त्यांना यांच्याच प्रायव्हेट हॉस्पिटल मध्ये दाखल होण्याचा सल्ला देतात किंवा उल्हासनगरला किंवा अन्य ठिकाणी जायला सांगतात.

असाच प्रकार मंगळवार दि.१२ एप्रिल २०२२ रोजी तापकिरवाडी येथील आदिवासी महिलेच्या बाबतीत घडला. उषा दत्तात्रय नवले यांना सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास प्रसूती वेदना जाणवू लागल्याने नातेवाईकांनी त्यांना ग्रामीण रूग्णालय कशेळे येथे नेले. तेथे डॉक्टर उपस्थित नव्हते.काही वेळाने हजर झाले त्यांनी गरोदर महीलेला तपासले असता त्यांनी पुढे कर्जत येथे उपजिल्हा रूग्णालय येथे जाण्यास सांगितले परंतु कशेळे येथे रूग्णवाहिका सुद्धा उपलब्ध नव्हती म्हणून त्या गरोदर महिलेला रिक्षाने कर्जत येथे उपजिल्हा रूग्णालय येथे नेण्यात आले. तेथे दाखल करताना तेथे ही डॉक्टर उपलब्ध नाहीत असे स्टाफ यांनी सांगितले. तेथून पुन्हा रिक्षाने कर्जत येथील ' मातोश्री ' दवाखाना येथे नेण्यात आले. यामध्ये चार तास धावपळीत गेले तेथे रात्री नऊ वाजता अडमिट करण्यात आले. परंतु नोंदणी असून सुद्धा कर्जत उपजिल्हा रुग्णालयात का अडमिट केले नाही असा प्रश्न मातोश्री मध्ये विचारण्यात आला. या विषया संदर्भात राजिप चे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांना या विषयी माहीती देण्यात आली. त्यांनी तात्काळ मातोश्री येथील डॉक्टर पवार यांना लक्ष देण्यास सांगितले. त्या नंतर सदर महिलेची नॉर्मल डिलिव्हरी झाली. असे असेल तर कशेळे, कडाव किंवा कर्जतच्या डॉक्टरांनी सदर महिलेला का दाखल करून घेतली नाही या बाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी उत्तर द्यावे. पूर्वीच्या काळी सर्वच महिलांची डिलिव्हरी घरीच सुईणीं करायच्या.कोणतेही प्रशिक्षण नसले तरी आपल्या अनुभवाने अवघडात अवघड डिलिव्हरी सुद्धा त्यांच्या मार्फत होत असे. सरकारी दवाखान्यात प्रशिक्षित नर्स आणि डॉक्टर असून सुद्धा त्यांना अवघड वाटणारे काम जर सुईण करू शकत असेल तर प्रत्येक सरकारी दवाखान्यात किमान दोन सुईणींची नेमणूक शासनाने करावी अशी मागणी उदय पाटील यांनी शासनाकडे केली आहे.

## मुरुडची ग्रामदेवता श्री कोटेश्वरी मातेच्या पालखी सोहळ्याचे आयोजन



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुडची ग्रामदेवता श्री कोटेश्वरी मातेचा पालखी सोहळा व यात्रोत्सव सालाबाद प्रमाणे यंदा दि. १४/०४/२०२२ ते १५/०४/२०२२ रोजी संपन्न होत आहे. दोन वर्षांच्या प्रदीर्घ कोरोणा काळानंतर आज या पालखी सोहळ्याला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. या पालखी सोहळ्यात बहुसंखेने भाविकांनी सहभागी होऊन पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

उत्सव समिती व कोटेश्वरी देवस्तानातर्फे हा पालखी सोहळा व जत्रोत्सव साजरा करण्यात येतो. सन २००४ पासून कोटेश्वरी देवस्तान मंडळ, सर्व समाज अध्यक्ष व गावांतील भाविक यांच्या विचारविनिमयाने कोटेश्वरी मातेच्या सवाद्य पालखी मिरवणूक काढण्याची प्रथा सुरु केली आहे. दरवर्षी गावातील सर्व भाविक पालखी मिरवणूकीमध्ये भक्ति भावाने सहभागी होत असल्यामुळे कोटेश्वरी मातेचा पालखी उत्सव सोहळा मोठ्या उत्साहाने व आनंदाने संपन्न होत असतो. या वर्षी मातेच्या वार्षिक उत्सवाच्या आदल्या दिवशी म्हणजे दि.१४/०४/२०२२ रोजी श्री कोटेश्वरी मातेची सवाद्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. या पालखी सोहळ्याचे मार्ग पुढील प्रमाणे आहे. सायंकाळी ०५:०० वाजता श्री कोटेश्वरी मंदिर येथून प्रारंभ होवुन दत्तवाडी परिसरातून पुन्हा कोटेश्वरी मंदिर येथे समाप्ती होईल. व दुसऱ्या दिवशी दिनांक १५/०४/२०२२ रोजी मंदिराच्या आवारात जत्रोत्सव साजरा करण्यात येतो. अशा प्रकारे या सोहळ्याची सांगता होते.

## भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कर्जत नगरपरिषदेतर्फे अभिवादन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी आज नगरपरिषद कार्यालयात अभिवादन केले. त्यानंतर सर्वांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर अभिवादन केले.

याप्रसंगी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, नगरसेवक राहुल डाळींबकर, बळवंत घुमरे, सोमनाथ ठोंबरे, नगरसेविका स्वामिनी मांजरे,पुष्पा दगडे, प्राची डेरवणकर, मधुरा चंदन, संचिता पाटील, विशाखा जिनगरे आदी सह अधिकारी, कर्मचारी वर्ग उपस्थित होता.



## श्रीवर्धन शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीची भव्य मिरवणूक

**दै.रायगड नगरी । दिघी**



श्रीवर्धन तालुक्यातील दक्षिण विभागाच्या वतीने बौद्ध हितकारणी सभा यांच्या माध्यमातून शहरात मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ते शिवाजी चौक, आणि आंबेडकर भवन असे शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. बालगोपाळांनी व तरुणांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, व इतर महापुरुषांची व्यक्तिरेखा रेखाटली होती. त्यासोबत डॉक्टर वकील अंगणवाडी सेविका शिक्षिका पोलिस प्रशासनातील अधिकारी राजकीय पुढारी अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींची व्यक्तिरेखा त्यांच्या पेहरावा नुसार शोभायात्रा दरम्यान तरुणांनी रेखाटली आहे.

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते महेश पवार यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन करत असताना सांगितले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वामुळेच आपणा सर्वांना मानवतेची वागणूक मिळालेली आहे. डॉक्टर बाबासाहेबांनी संघर्ष केल्यामुळे आज तळागाळातील सर्वसामान्य माणूस सक्षम पणे आपल्या पायावर उभा राहून समर्थपणे आयुष्य जगू शकतो. बाबासाहेबांनी मानव जातीला विविध जोखडातून मुक्त केलेल आहे. जातीप्रथा अनिष्ट रूढी परंपरा या सर्वांना मूठमाती देण्याचा काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केलं. माणसाला माणूस म्हणून जगण्याची शक्ती बाबासाहेबांनी प्रदान केली. बाबासाहेबांच्या संघर्षामुळे समाजातील अनेक घटकांचा उत्कर्ष झाला. बाबासाहेबांचे विचार बाबासाहेबांची कृती सर्वसामान्यांसाठी दिशादर्शक आहे. आजमितीस प्रत्येक व्यक्तीला कायद्याचे संरक्षण आहे. बाबासाहेबांनी लिहिलेली राज्यघटना आज देशातील प्रत्येक व्यक्तीच्या संरक्षणासाठी समर्थ आहे बाबासाहेबांच्या जन्मामुळे अनेक शोषित पीडित बंधनातून मुक्त झालेले आहेत. असे महेश पवार यांनी सांगितले त्यासोबत कार्यक्रम प्रसंगी संजय मोरे के के येलवे संतोष सापते योगेश लोखंडे,रायगड भूषण चंद्रकांत उंदिलकर यांनी उपस्थित बांधवांना संबोधित केले. कार्यक्रमाच्या प्रसंगी बौद्ध हितकारणी सभेचे हरिचंद्र जाधव दीपक शिर्के मानसी साखरे मेघा शिर्के दिनेश तांबे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनात सिद्धार्थ कला निकेतन भारतीय बौद्ध महासभा सिद्धार्थ ग्राम सेवा मंडळ आदी संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे.

## माथेरानमध्ये व्हीलचेअर लोकार्पण सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान सेवाभावी संस्थेने येथील इंदिरा नगर येथील रहिवासी रुग्णांच्या सेवेसाठी मोफत व्हीलचेअर उपलब्ध करून दिली असून त्याचा लोकार्पण सोहळा आज पार पडला.

माथेरानमध्ये वैद्यकीय सेवा मर्यादित आहे त्यामुळे येथील विविध विभागातील नागरिकांना हॉस्पिटल पर्यंत जाताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते अनेकवेळा रुग्णवाहिका उपलब्ध होत नाही किव्हा अनेक ठिकाणी रुग्णवाहिका पोहचू शकत नाही अशावेळी व्हीलचेयर एक चांगला पर्याय होऊ शकतो पण तसा प्रयत्न आतापर्यंत झाला नव्हता, माथेरान मधील इंदिरा नगर ही असाच विभाग असून अरुंद रस्ते व चढ उताराचे रस्ते यामुळे येथे रुग्णवाहिका पोहचू शकत नाही त्यामुळे येथील रहिवासी रुग्णांना रुग्णवाहिकेपर्यंत नेण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत होती.

त्यामुळेच येथील सेवाभावी संस्थेने येथील स्थानिकांसाठी व्हीलचेयर उपलब्द केली असून त्याच्या लोकार्पण सोहळ्याचे औचित्य साधत नगरातील जेष्ठ नागरिक श्री जानू ढेबे, येथील शिक्षिका सौ जयश्री चंद्रकांत सावंत, जेष्ठ महिला श्रीमती सारिका शिंदे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री लक्ष्मण ढेबे पत्रकार श्री मिलिंद कदम यांच्या सत्कार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माथेरानच्या मुख्याधिकारी सौ. सुरेखाजी भणगे शिंदे माथेरान चे एपीआय श्री शेखर लव्हे व वैदकीय अधिकारी श्री उदय तांबे यांच्या हस्ते करण्यात आला.

ह्यावेळी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष आशिष सावंत, संतोष आखाडे व सुनीता आखाडे व संतोष पवार यांनी आपले मनोगत व उपस्थितांचे आभार मानले.



## उरणमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । उरण**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती व महावीर जयंती सोहळ्याचे औचित्य साधून उरण तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी अनेक अनुयायांनी, रहिवाशांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.


कोरोनाच्या काळात दोन वर्षे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याचा योग न आल्याने अनेक अनुयायांनी रहिवाशांनी आप आपल्या कुटुंबासह डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजा केली. यावर्षी शासनाने निर्बंध हटविल्याने ठिक ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याचा निर्णय अनुयायांनी रहिवाशांनी घेतला होता. त्यानुसार अनेकांनी उरण शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यासाठी उरण शहरातील नेते प्रकाश कांबळे, सदानंद गायकवाड यांच्या उपस्थितीत गर्दी केली होती. जेएनपीटी बंदराच्या वसाहती मध्ये ही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच गावोगावी कार्यकर्त्यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व महावीर जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला ही पुष्पहार अर्पण करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



## गोवे येथे हनुमान जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

रोहा तालुक्यातील मौजे गोवे येथे सालाबाद प्रमाणे हनुमान जयंती उत्सवानिमित्ताने शुक्रवार दि.१५/४/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा, सायंकाळी ६ ते ७ वाजता किल्ला व कोलाड विभाग वारकरी संप्रदाय यांचा हरिपाठ,रात्री ९ ते ११ ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पाटील खानावकर (खोपोली )यांची किर्तन सेवा, नंतर हरि भजनाचा कार्यक्रम होईल.



तसेच शनिवार दि.१६/४/२०२२ रोजी दुपारी ३.०० पालखी सोहळा आयोजित करण्यात येणार असून सर्व कार्यक्रम यशस्विकरण्यासाठी गावकमेटी अध्यक्ष नामदेव जाधव, सचिव श्रीधर गुजर, उपसचिव प्रवीण पवार, खजिनदार कमलाकर शिर्के, उपखजिनदार सुरेश जाधव, सदस्य बळीराम जाधव, रविंद्र जाधव, शंकर दहिंबेकर, शांताराम घरट, नथुराम मांजरे, तसेच ग्रामस्थ मंडळ, तरुण वर्ग, महिला मंडळ मेहनत घेत आहेत.

## पनवेल उपजिल्हा रुग्णालयात त्वचा, प्रसुतीचे रुग्ण वाढले; उष्माघाताच्या एकही रुग्णाची नोंद नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना तिसऱ्या लाटेत कोविड रुग्णालयाचा दर्जा प्राप्त असलेल्या उपजिल्हा रुग्णालय नॉनकोविड म्हणुन नजीकच्या तीन महिन्यापासून कार्यरत आहे.

पनवेल मध्ये कोविडची तिसरी लाट पूर्णपणे ओसरली आहे. क्वचितच कोविडचा एखादा दुसरा रुग्ण आढळत आहे.

अशा परिस्थितीत इतर रुग्णांच्या ओपीडीत प्रचंड वाढ झाली आहे. यामध्ये बहुतांशी त्वचा रोगाच्या रुग्णांची संख्या मोठी आहे. या व्यतिरिक्त प्रसुती, नसबंदीच्या शस्त्रक्रिया मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

दररोज जनरल ओपीडीत सुमारे १०० ते १५० रुग्ण भेट देत असतात.नॉन कोविड नंतर तीन महिन्याच्या काळावधित ६० महिलांच्या प्रसूती यशस्वीपणे पार पडल्या तर २९ महिलांची नसबंदी शस्त्रक्रिया पार पडली. एकीकडे पारा ४० डिग्री च्या वर पोहचला आहे. मागील दोन महिन्यापासून वाढत्या तापमानाने सर्वांचीच तारांबळ उडाली असताना पनवेल उपजिल्हा रुग्णालयात एकही उष्माघाताच्या रुग्णाची नोंद करण्यात आली नसल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ सचिन संकपाळ यांनी दिली. तसेच कोरोना नंतर डोकेदुखी, सर्दी, अंगदुखी, ताप, त्वचारोग यांसारख्या रुग्णांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. जानेवारीत त्वचा, तर फेब्रुवारी, मार्च प्रसूतीच्या संख्येत वाढ झाली आहे.

दरम्यान, पनवेल तालुक्यात कोरोना रुग्ण संख्येचा आकडा एका लाखाच्या पार झाला आहे. मात्र सध्यातरी पनवेल मध्ये तिसरी लाट पूर्णपणे ओसरली असून केवळ हाताच्या बोटावर मोजण्या एवढे रुग्ण तालुक्यात आहेत. त्यामुळे कोरोना पनवेल मधुन पूर्णपणे पळाला असल्याचे दिसुन येत आहे.